# नानावटी रुग्णालयात कर्करोगावर 'जनजागृती'

**मुंबई (प्रतिनिधी) :** महिलांमध्ये वाढत्या स्तनाच्या कर्करोगासंदर्भात महिलांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी नानावटी सुपर स्पेशालिटी रुग्णालयात (एनएसएसएच) एकदिवसीय मोफत 'जागृती' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी स्तनाच्या कर्करोगाशी संबंधित विविध पैलू उलघडून सांगण्यात आले. नानावटी रुग्णालयातील कर्करोग विभागाचे प्रमुख डॉ. संजय दुधात यांनी या आजाराबाबत उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. स्तनाचा कर्करोगावर मात करण्यासाठी कोणकोणती उपाययोजना करणे आवश्यक आहे, यासंदर्भात डॉ. दुधात यांनी सविस्तरपणे विचार मांडले. योग्य निदान व वेळेवर उपचार स्तनाच्या कर्करोगग्रस्तांची संख्या कमी करू शकतात, असेही ते म्हणाले. 'ब्रेस्ट सेल्फ-एक्झामिनेशन' (बीएसई) यासारख्या आधुनिक तपासणी तंत्रामुळे सुरुवातीच्या टप्प्यात रोगाचे निदान करणे शक्य होते. या रुग्णालयातील क्ष-किरण तज्ज्ञ डॉ. रश्मी पारिख यांनी स्तनाच्या कर्करोगाचे योग्य निदान करण्यासाठी आवश्यक अत्याधुनिक तंत्रज्ञानाची यावेळी माहिती दिली. याप्रसंगी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.